Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 18TH MARCH 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख १६ माहे फेब्रुआरी सन १८९७.

नंबर १३०५.—हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या ५ व्या व ७ व्या कलमांअन्वयें दिलेल्या अधिकारांवरहुकुम ज्या कांहीं कानू करण्याचें योजिलेलें आहे त्यांचा खालीं लिहिलेला मसुदा सदर्हू आक्टाच्या १८व्या कलमांत आणि हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील तारीख २ सप्टेंबर१८८७ चा जाहिरनामा नंबर १९६४ यांत फर्माविल्याप्रमाणें, त्या कानूंशीं संबंध असण्याचा संभव असलेल्या मनुष्यांच्या माहितीसाठीं, प्रसिद्ध केला आहे, आणि यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिना उलटून गेला ह्मणजे त्या मसुद्याचा विचार करण्यांत येईल.

२. सदर्हू तारखेपूर्वी ज्या कोणत्याही मनुष्याकडून त्या मसुद्यासंबंधाची जी कोणती हरकत अगर सूचना लिहून येईल तिचा नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल यांकडून विचार करण्यांत येईल.

**मसुदा.**

सरकारचा जाहिरनामा नंबर ४११६, तारीख ५ जुलै १८८७ हा रद्द करून आणि हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याचीं कलमें ५ व ७ यांवरून दिलेले अधिकार चालवून, आलिजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांणीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, बारी पदार्थ मुंबई इलाक्यांत तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांचें नियमन करण्याविषयीं खालीं लिहिलेल्या कानू केल्या आहेत.

बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याच्या संबंधाचा या कानूंतील कोणताही ठराव, सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबदचा आक्ट यांत व्याख्या केलेल्या प्रकारच्या ज्या कोणत्याही बंदरासाठीं स्थानिक सरकारानें, बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचें नियमन करण्याबाबद सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट याअन्वयें विशेष कानू केल्या असतील किंवा तें सरकार करील, त्या बंदरांत लागू नाहीं असें समजावें.

कोणताही बारी पदार्थ जर—

(अ) सरकारच्या हुकुमावरून, अथवा,

(ब) हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) अमलांत आणण्याकरितां ह्मणून अगर म्यागझीनचा रखवालदार म्हणून, शिल्पकार म्हणून, लष्करी शिपाई म्हणून, खलाशी म्हणून पोलीसमन म्हणून अगर इतर रीतीनें सरकारच्या नोकरीस ठेविलेल्या कोणत्याही मनुष्यानें अगर इंडियन

व्हालंटियर आक्ट ( सन १८६९ चा २० वा ) याअन्वयें व्हालंटियर म्हणून पटांत दाखल केलेल्या कोणत्याही मनुष्यानें, त्या त्या नात्यानें आपल्या नोकरीच्या कामीं अगर वास्तविक कामाच्या संबंधानें, कोणताही बारी पदार्थ तयार केला, कबजांत ठेविला, अगर विकला, तर, त्या बाबतींत, ह्या कानूंतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

**बारी पदार्थ मुंबई इलाख्यांत तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयीं, सन १८८४ चा बारी पदार्थांविषयींचा आक्ट याअन्वयें कानू.**

**प्रथमारंभींचे ठराव.**

[ कानू १ आणि बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्याबाबदच्या व आयात करण्याबाबदच्या कानूंपैकीं कानू १, ह्या एकच आहेत. ]

**तयार करणें, कबज्यांत ठेवणें, व विकणें.**

**(अ) सामान्य कानू.**

२. कोणताही बारी पदार्थ तयार करणें तो, तो बारी पदार्थ तयार करण्याबाबद ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्सांतील शर्तींबरहुकुम व त्या शर्तींअन्वयें खेरीजकरून इतर रीतीनें तयार करतां कामा नये.

मात्र, ही कानू,—

(अ) व्यवहारांत उपयोग करण्यासाठीं किंवा विकण्यासाठीं नसून, रसायनशास्त्रसंबंधी प्रयोग करण्याच्या कारणासाठीं बारी पदार्थ थोडकासा करण्याच्या बाबतींत; किंवा

(ब) जितकीं सेफ्टी काडतुसें खासगी उपयोगासाठीं कबज्यांत ठेवण्याची ह्या कानूंवरून परवानगी आहे त्या संख्येपर्यंत कितीही काडतुसें, विकण्यासाठीं नव्हत, पण खासगी उपयोगासाठीं भरण्याच्या बाबतींत

लागू नाहीं असें समजावें.

३. जो कोणताही मनुष्य, २ ऱ्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ तयार करील, तो तीन हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

४. कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें तो, तो बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याला ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्सांतील शर्तींबरहुकुम व त्या शर्तींअन्वयें खेरीजकरून इतर रीतीनें ठेवितां कामा नयेः

मात्र, ही कानू—

(१) कोणी मनुष्य, विकण्याकरितां नसून आपल्या खासगी उपयोगाकरितां—

(अ) एकाच जागीं ३० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी बंदुकीची दारू, किंवा सदहू इतक्या बंदुकीच्या दारूच्या बदला १९ रत्तल दुसरा कोणताही बारी पदार्थ, किंवा सदहूप्रमाणें कबज्यांत ठेविलेली नाहीं अशा सदहूहून कितीही कमी बंदुकीच्या दारूच्या बदला तिच्या निमे दुसरा बारी पदार्थ, अथवा

(ब) १९० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी सेफ्टी काडतुसांत भरलेली बंदुकीची दारू, किंवा तिच्या बदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला १९० रत्तल कोणताही बारी पदार्थ, किंवा सदहूप्रमाणें कबज्यांत ठेविलेली नाहीं अशा सदहूहून कितीही कमी बंदुकीच्या दारूच्या बदला तितकाच सदहूप्रमाणें भरलेला कोणताही बारी पदार्थ

कबज्यांत ठेवील त्या मनुष्यास लागू नाहीं असें समजावेंः

**अपवाद**—या कानूंतील विशेष ठरावाच्या सदरील भागांतील कोणत्याही ठरावावरून,

(अ) ९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गाचा कोणताही बारी पदार्थ; किंवा

(ब) जो कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याची, हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ( सन १८८४ चा ४ था ) याच्या ६ व्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करून निखालस मनाई केलेली असेल तसा बारी पदार्थ; किंवा

(क) जेव्हां एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याची त्या कलमाअन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध करून शर्तीनिशीं मनाई केली असेल तेव्हां त्या शर्तींअन्वयें खेरीजकरून इतर रीतीनें तसा कोणताही बारी पदार्थ;

खासगी उपयोगासाठीं कबज्यांत ठेवण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

(२) जर दारूकामाचा तत्काल उपयोग करण्यासाठीं तें घेतलें असेल व तें विकण्यासाठीं घेतलें नसेल तर, व तें जर १४ दिवसांहून अधिक नाहीं अशा कोणत्याही मुदतीपर्यंत निर्भय व योग्य जागेंत व लोकांच्या सुरक्षितपणासाठीं सर्व योग्य पूर्वोपाय करून ठेवलें असेल, तर तें वाटेल तितकें कबज्यांत ठेवण्यास:

(३) कोणताही बारी पदार्थ एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं नेण्याच्या कारणासाठीं हुंडेकऱ्यानें किंवा दुसऱ्या मनुष्यानें, जेव्हां असा बारी पदार्थ एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं नेण्याबाबद हिंदुस्थानचा बारी पदार्थांबाबद आक्ट ( सन १८८४ चा ४ था ) याअन्वयें केलेल्या कानूंनील ठरावांस अनुसरून तो बारी पदार्थ ठेविला असेल किंवा नेण्यांत येत असेल त्या प्रसंगीं, त्यानें कबज्यांत ठेवण्यास; किंवा

(४) त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या व्यापारी लोकांच्या तारवांविषयींच्या आक्टांतील किंवा त्याअन्वयें केलेल्या कोणत्याही हुकुमांतील किंवा नियमांतील ठरावांप्रमाणें कोणत्याही तारवावर कोणतीही बंदुकीची दारू, बाण किंवा दुसरा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्यास:

लागू नाहीं असें समजावें.

५. जो कोणताही मनुष्य ४ थ्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवील, तो एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६. कोणताही बारी पदार्थ विकणें तो, तो बारी पदार्थ विकण्याला ह्या कानूंअन्वयें दिलेल्या लैसेन्सच्या शर्तीबरहुकुम व त्या शर्तींअन्वयें खेरीजकरून इतर रीतीनें विकतां कामा नये:

मात्र, कोणत्याही मनुष्याच्या कबज्यांत त्याच्या खासगी उपयोगासाठीं जो कोणताही बारी पदार्थ कायदेशीर रीतीनें असेल तो त्यानें, तो बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याची ज्यास कायदेशीर रीतीनें मनाई नाहीं अशा कोणत्याही मनुष्यास विकला असतां, त्या मनुष्यास ही कानू लागू नाहीं असें समजावें.

७. जो कोणताही मनुष्य ६ व्या कानूविरुद्ध एकादा बारी पदार्थ विकील तर, तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

## ( ब ) बंदुकीची दारू व कित्येक बारी पदार्थ तयार करण्याविषयीं, कबज्यांत ठेवण्याविषयीं व विकण्याविषयीं लैसेन्स देणें.

८. लैसेन्स देणारा अमलदार पसंत करील तितक्या एकंदर मानानें लैसेन्स चालू असल्या मुदतींत, व तो पसंत करील तशा जागेंत, १ ल्या ( बंदुकीच्या दारूच्या ) वर्गाचा किंवा ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागाचा किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाचा एकादा बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींचे अगर कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींचे अगर कबज्यांत ठेविण्याविषयींचे लैसेन्स देण्याचा अधिकार इलाका शहरांत व त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास, आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटास आहे:

मात्र, अशा कोणत्याही लैसेन्सांतील कोणत्याही ठरावावरून, तो लैसेन्स धारण करणारास, ज्या जागेस तें लैसेन्स लागू असेल त्या जागेंत एकाच वेळीं २०० हून अधिक रत्तल बंदुकीची दारू, ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला १०० हून अधिक रत्तल बारी पदार्थ, आणि २०० हून अधिक रत्तल दारूकाम, अथवा लैसेन्स देणारा अमलदार या बाबतींत ह्या बारी पदार्थांपैकीं कोणत्याही बारी पदार्थांचें जें कोणतेंही सदरहूपेक्षा कमी मान फर्मावील त्या मानाहून अधिक मानानें तो बारी पदार्थ, ठेवण्याचा हक्क प्राप्त होतो असें समजूं नये:

९. सदरील शेवटल्या कानूअन्वयें दिलेल्या प्रत्येक लैसेन्साबद्दल खालीं लिहिलेल्या फी दिल्या पाहिजेत: त्या येणेंप्रमाणें:—

(१) सदरील शेवटच्या कानूंत जें परमावधीचें मान सांगितलें आहे त्या मानानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल वीस रुपये फी;

(२) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या निमे मानानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें, व विकणें यांविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल दहा रुपये फी;

(३) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या चतुर्थांशानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें, व विकणें याविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी;

(४) सदरील शेवटच्या कानूंत जें परमावधीचें मान सांगितलें आहे त्या मानानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल दहा रुपये फी;

(५) सदरील शेवटच्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या निमे मानानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल पांच रुपये फी;

(६) सदरील शेवटल्या कानूंत जें मान सांगितलें आहे त्याच्या चतुर्थांशानें किंवा त्याहून कोणत्याही कमी मानानें बारी पदार्थ कबज्यांत ठेवणें व विकणें याबद्दल दोन रुपये आठ आणे फी; आणि

(७) बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयींच्या प्रत्येक लैसेन्साबद्दल आठ आणे फी.

**१०.** ८ व्या कानूअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स, या कानूस जोडलेल्या परिशिष्टांतील अ, ब किंवा क, यांपैकीं प्रसंगानुरूप असेल त्या नमुन्याप्रमाणें असून त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र असला पाहिजे.

**११.** ८ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील, तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

### (क) इतर बारी पदार्थ तयार करण्याविषयीं लैसेन्स देणें.

१२. ८ व्या कानूंत सांगितलेल्या बारी पदार्थांखेरीज इतर बारी पदार्थ तयार करण्याविषयीं लैसेन्स देणें ते, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे प्रत्येक बाबतींत ज्या फी, जो नमुना, जी मुदत, आणि ज्या शर्ती ठरवितील त्या फी दिल्या असतां, तशा नमुन्याप्रमाणें, तशा मुदतीचे आणि तशा शर्तींस पात्र करून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल देतील.

मात्र, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांणीं अशा कोणत्याही बारी पदार्थ तयार करण्याविषयींच्या लैसेन्साच्या बाबतींत, तो लैसेन्स ज्या प्रकारच्या व जितक्या बारी पदार्थांबाबद असेल तशा प्रकारचा व तितका बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयींच्या लैसेन्सांकरितां यांत पुढें ज्या शर्ती ठरविल्या आहेत त्या सर्व शर्ती ठरविल्या पाहिजेत.

**१३.** १२ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील तो तीन हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

### (ड) इतर बारी पदार्थ थोडक्या मानानें कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देणें.

**१४.** ८ व्या कानूंत निर्दिष्ट केलेल्या बारी पदार्थांखेरीज दुसरे बारी पदार्थ, लैसेन्स देणारा अमलदार पसंत करील तशा जागांत कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देण्याचा अधिकार, जर बारी पदार्थ ९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गाचा नसेल तर, आणि जर एकाच वेळीं ६० रत्तलांहून अधिक मानानें तो कबज्यांत ठेवावयाचा नसेल तर, इलाका शहरांत व त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरास आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटास आहे.

१५. १४ व्या कानूअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स या कानूस जोडलेल्या परिशिष्टांतील ड नमुन्याप्रमाणें असून त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र असला पाहिजे. अशा प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी दिली पाहिजे.

१६. १४ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तींस पात्र करून दिला असेल त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील, तो एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

### (इ)—साधारणतः बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स देणें.

१७. कानू ८ व १४ यांअन्वयें देतां येतात त्यांखेरीज बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयींचे लैसेन्स देणें ते, जर बारी पदार्थ ९ व्या ( फल्मिनेटच्या ) वर्गाचा नसेल तर, खालीं लिहिलेल्या काम चालविण्याच्या रीतीस अनुसरून सरकाराकडून देण्यांत येतील:—

(१) अर्जदारानें जिल्हा-माजिस्ट्रेटास, किंवा, इलाका शहरांत व त्यांच्या पोट गांवांत पोलीस कमिशनरास, लेखी अर्जी दिली पाहिजे आणि त्या अर्जीबरोबर, ज्या जागेंत बारी पदार्थ ठेविण्याचें योजलें असेल ( अशा जागेस यांत मागझीन असें म्हटलें आहे ) त्या जागेचा व तिच्या ठिकाणचा ( अंतराच्या नियमित प्रमाणानें काढलेला ) नकाशा असला पाहिजे.

(२) त्या अर्जांत, खालीं लिहिलेल्या गोष्टींपैकीं ज्या गोष्टी लागू असतील त्या निर्दिष्ट केल्या पाहिजेत, त्या येणेंप्रमाणें:—

(अ) जी जमीन त्या मागझीनचें ठिकाण असेल त्या जमिनीच्या चतुःसीमा, आणि त्या ठिकाणाच्या सभोंवताल्चो जी जमिनीची कोणतीही पट्टी मोकळी ठेवावयाची असेल ती जमिनीची पट्टी, व ज्या इमारतींपासून व कामांपासून तें ठिकाण अलग ठेवावयाचें असेल त्या इमारती व कामें, अथवा मागझीन, किंवा त्याचा कोणताही भाग, आणि दुसऱ्या इमारती व कामें यांच्यामध्यें ठेवावयाचीं अंतरें;

[ ह्यासंबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा त्यांच्या मंजुरीनिशीं स्थानिक सरकारानें कमींत कमी अंतरांचें कोष्टक ठरविलें असेल, तर, मागझीन आणि निरनिराळ्या प्रकारच्या इमारती यांच्या दरम्यान अंतरें ठेवावयाचीं तीं, अंतरांच्या सरकारी यादींत त्या बारी पदार्थाच्या संबंधानें, आणि तो ज्या परिमाणानें सांठवून ठेवावयाचा असेल त्या परिमाणाच्या बाबतींत जीं अंतरें निर्दिष्ट केलेलीं असतील त्यांहून कमी असूं नयेत. ]

(ब) मागझीनवरील किंवा मागझीनच्या संबंधाचे सर्व बांध, इमारती व कामें यांचें स्थान, प्रकार व बांधणी, आणि त्यांचीं एकमेकांपासून अंतरें;

(क) मागझीनच्या चतुःसीमांच्या आंत एकाच वेळीं जे बारी पदार्थ, व त्यांचीं सर्वांशीं किंवा अंशतः मिश्र केलेलीं जीं द्रव्यें ठेवूं द्यावयाचीं असतील त्यांचें मान; आणि

(ड) तो प्रदेश, कोणत्याही इमारतींचा किंवा कामांचें स्थान किंवा बांधणी किंवा कोणत्याही क्रियेचा प्रकार यामुळें किंवा इतर प्रकारें उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही विशेष हकीकतींच्या कारणानें अर्जदार ज्या कोणत्याही विशेष अटी योजील त्या अटी.

(३) सदर्हू अर्जी पोंहचल्यावर—

(अ) जिल्हा-माजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर यांतून प्रसंगानुरूप जो असेल त्यानें त्या अर्जीबाबद नोटीस प्रसिद्ध करविली पाहिजे, आणि योजलेल्या ठिकाणीं मागझीन स्थापण्याविषयीं जीं मनुष्यें हरकत सांगत असून ज्यांनीं हजर होऊन हरकत सांगण्याच्या आपल्या इराद्याबाबद एक नोटीस, तींत आपलीं नांवें, पत्ते व धंदे, आणि आपल्या हरकतीच्या सबबींचा थोडक्यांत तपशील हीं लिहून, सुनावणीच्या तारखेपूर्वीं निवळ सात दिवस अगोदर, सदर्हू जिल्हा-माजिस्ट्रेटास किंवा पोलीस कमिशनरास आणि अर्जदारास दिली असेल; त्यांच्या हरकतींची सुनावणी करण्यासाठीं एक तारीख ठरविली पाहिजे.

(ब) जेव्हां योजलेल्या मागझीनचें ठिकाण कोणत्याही म्युनिसिपालिटीच्या किंवा कोणत्याही बंदर अधिकाऱ्याच्या हुकुमतीच्या हद्दींत किंवा त्या हद्दींपासून एक मैलाच्या आंत असेल, तेव्हां अर्जदारानें अशा अधिकाऱ्यावर सदर्हू अर्जीबाबद, व जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस कमिशनरानें सुनावणी करण्यासाठीं ठरविलेल्या तारिखेबाबद, नोटीस बजाविली पाहिजे.

(क) सदर्हू नोटिसा जिल्हा-माजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर यानें सुनावणीच्या तारखेपूर्वीं निदान एक महिना अगोदर अर्जदाराच्या खर्चानें प्रसिद्ध केल्या पाहिजेत व बजाविल्या पाहिजेत.

(ड) जिल्हा-माजिस्ट्रेटास किंवा पोलीस कमिशनरास अर्जी केल्यानंतर होईल तितक्या लवकर त्यानें सुनावणी करण्याची तारीख ठरविली पाहिजे, आणि याप्रमाणें ठरविलेली वेळ, अर्जदारानें नोटिसा प्रसिद्ध केल्यापासूनचा व बजाविल्यापासूनचा सदर्हू महिना संपल्यानंतर होईल तितकी लवकरची असली पाहिजे.

(ई) अर्जीचा विचार केल्यावर, आणि जरूर वाटेल तशी चौकशी केल्यावर, जिल्हा-माजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनर हा योजलेल्या ठिकाणीं असें नवीन मागझीन स्थापण्याविषयीं परवानगी मुळींच न देण्यास, किंवा त्याविषयीं पूर्णपणें, अगर जास्ती अटी किंवा पूर्वोपाय ठरवून कोणत्याही शर्तींवर, संमति देण्यास मुखत्यार आहे.

(फ) चौकशी पुरी झाल्यावर जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा पोलीस कमिशनरानें आपल्या शिफारशीसहित ती अर्जी स्थानिक सरकारास पाठविली पाहिजे; मग त्या सरकारास, मागितलेला लैसेन्स,

जिल्हा-माजिस्ट्रेटाच्या किंवा पोलीस कमिशनराच्या शिफारशीप्रमाणें, किंवा योग्य वाटतील तशा जास्त अटींनिशीं किंवा पूर्वोपायांनिशीं देण्याचा, किंवा देण्यास इनकार करण्याचा अधिकार आहे.

मात्र, योजिलेल्या मागझीनचें कोणत्याही राहावयाच्या घरापासून, भररस्त्यापासून, स्ट्रीटपासून, रहदारीच्या सार्वजनिक मार्गापासून अगर सार्वजनिक जागेपासून अंतर २०० यार्डांहून कमी असेल, अगर, इतर कोणत्याही कारणासाठीं, बारीपदार्थांच्या एकाद्या इन्स्पेक्टरानें ती जागा तपासल्यानंतर त्याचें मत घेणें इष्ट आहे असें स्थानिक सरकारास वाटेल, तर, त्या सरकारानें, लैसेन्स देण्याच्या आधीं तसें मत घेतलें पाहिजे.

पाळावयाचें अंतरांचें कोष्टक ठरविलेलें असल्यास, ह्याप्रमाणें ठरविलेले कमींत कमी अंतराबाबदचे ठराव तोडण्यांत आलेले नाहींत हें पाहिलें ह्मणजे बस होईल:

मात्र, तो अर्ज जर, अंतरांचें कोष्टक फर्माविण्याच्या आधीं दिलेलें लैसेन्स नवीन करून देण्याबाबद असेल, तर, बारी पदार्थांच्या इन्स्पेक्टरानें, तें लैसेन्स त्याप्रमाणें नवीन करून देण्यांत धोका नाहीं असा सल्ला दिल्यास, स्थानिक सरकारानें, अंतरांच्या कोष्टकाप्रमाणें चाललें पाहिजे अशी मागणी न करितां तें लैसेन्स नवीन करून दिलें असतां चालेल.

(ग) स्थानिक सरकारानें लैसेन्स दिला तर त्या सरकारानें तो जिल्हा-माजिस्ट्रेटाकडे किंवा पोलीस कमिशनराकडे पाठविला पाहिजे, आणि मागझीनचा उपयोग करणें वाजवी होईल इतक्या पुऱ्या रीतीनें तें मागझीन त्या लैसेन्साप्रमाणें तयार केलें आहे अशी त्या जिल्हा-माजिस्ट्रेटाची किंवा पोलीस कमिशनराची खात्री झाल्यास त्याणें तो लैसेन्स बहाल करावा; परंतु याप्रमाणें बहाल होई तोंपर्यंत तो लैसेन्स अमलांत येणार नाहीं.

१८. १७ व्या कानूअन्वयें दिलेल्या प्रत्येक लैसेन्साबद्दल २० रुपये फी दिली पाहिजे.

१९. १७ व्या कानूअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील ई नमुन्याप्रमाणें असून त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र राहील.

१९ अ.—हिंदुस्थान सरकारच्या पूर्वमंजुरीनिशीं आणि जरूर वाटतील त्या शर्ती अगर निर्बंध लागू करून, एकाद्या तऱ्हा मागझीनमध्यें कानू १७ अन्वयें बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याबद्दल अधिकार देण्याचा आणि अशा विशेष प्रसंगीं १७ व्या कानूंत सांगितलेल्या काम चालविण्याच्या रीतींत आणि नमुना ई प्रमाणें द्यावयाच्या लैसेन्सांत जरूर लागतील ते फेरफार करण्याविषयीं फर्मावण्याचा स्थानिक सरकारास अखत्यार आहे.

२०. १७ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तीस पात्र करून दिला असेल त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील, तो एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

२१. ९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गाचे बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयींचे लैसेन्स देणें ते, ज्या फी व जो नमुना व ज्या शर्ती प्रत्येक बाबतींत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ठरवितील त्या फी दिल्या असतां, त्या नमुन्याप्रमाणें व त्या शर्तींस पात्र करून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांकडून देण्यांत येतील.

२२. २१ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तीस पात्र करून दिला असेल त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील तो एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

## (क) इतर बारी पदार्थ विकण्याविषयीं लैसेन्स देणें.

२३. ८ व्या कानूंत सांगितलेल्या बारी पदार्थांखेरीज इतर बारी पदार्थ विकण्याविषयीं लैसेन्स देणें ते, ते बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स दिलेल्या कोणत्याही मनुष्यास इलाका शहरांत आणि त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनर व इतर ठिकाणीं जिल्हा-माजिस्ट्रेट हा देण्यास मुखत्यार आहे.

२४. २३ व्या कानूअन्वयें दिलेल्या प्रत्येक लैसेन्साबद्दल पांच रुपये फी दिली पाहिजे.

२५. २३ व्या कानूअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स या कानूंस जोडलेल्या परिशिष्टांतील फ नमुन्याप्रमाणें असून तो त्यांत सांगितलेल्या शर्तींस पात्र राहील.

२६. २३ व्या कानूअन्वयें दिलेला लैसेन्स ज्या कोणत्याही शर्तीस पात्र करून दिला असेल, त्या शर्तींचें जो कोणताही मनुष्य उल्लंघन करील तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

### (क) पुरवणी ठराव.

२७. खालीं निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अमलदारास, ह्याखालीं त्याच्या त्याच्या बाबतींत निर्दिष्ट केलेल्या प्रदेशामध्यें खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा अखत्यार आहे: ह्मणजे:—

(अ) ज्या कोणत्याही जागेमध्यें, गाडींमध्यें अगर तारवामध्यें सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ह्याअन्वयें दिलेल्या लैसेन्सावरहुकुम कोणताही बारी पदार्थ तयार करण्यांत येत असेल, कबजांत ठेविलेला असेल, वापरण्यांत येत असेल, विकण्यांत येत असेल, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत येत असेल, अगर आयात करण्यांत येत असेल, अगर ज्या जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें सदरहू आक्टाविरुद्ध किंवा सदरहू आक्टाअन्वयें केलेल्या कानूंविरुद्ध कोणताही बारी पदार्थ तयार करण्यांत आला आहे अगर येत आहे, कबजांत ठेविलेला अगर ठेवण्यांत येत आहे, वापरण्यांत आला आहे अगर येत आहे, विकण्यांत आला आहे अगर येत आहे, एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यांत आला आहे अगर येत आहे, अगर आयात करण्यांत आला आहे अगर येत आहे असें वाटण्यास सदरहू अमलदारास कारण असेल त्या जागेंत, गाडींत अगर तारवांत शिरून त्याची पाहाणी आणि तपासणी करण्याचा अखत्यार आहे;

(ब) त्यांत बारी पदार्थ शोधण्याचा अखत्यार आहे;

(क) त्यांत सांपडलेल्या कोणत्याही बारी पदार्थांचे नमुने, त्यांची किंमत देऊन घेण्याचा अखत्यार आहे; आणि

(ड) त्यांत सांपडलेल्या ज्या कोणत्याही बारी पदार्थासंबंधानें सदरहू आक्टाच्या अगर सदरहू आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांचा भंग झालेला आहे असें वाटण्यास कारण असेल तेव्हां तो पदार्थ आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें धरण्याचा, अटकावून ठेवण्याचा, काढून नेण्याचा, आणि सार्वजनिक सलामतीस आवश्यक असल्यास, त्याचा नाश करण्याचा, अखत्यार आहे.

| स्थलमर्यादा. | अमलदार. |
|---|---|
| मुंबई इलाख्याच्या सर्व भागांत ... ... ... | खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट.<br>खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे असिस्टंट सुपरिंटेंडंट. |
| आपापल्या जिल्ह्यांत ... ... ... ... | सर्व जिल्हा माजिस्ट्रेट. |
| आपापल्या हुकुमतीखालील प्रदेशांत... ... ... | जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील सर्व माजिस्ट्रेट. |
| मुंबई शहर व त्याचीं पोटगांवें यांत ... ... ... | पोलीस कमिशनर, मुंबई, आणि इन्स्पेक्टरच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा ज्या कोणत्याही पोलीस अमलदाराला पोलीस कमिशनर ह्यासंबंधानें मुद्दाम नेमितील, तो प्रत्येक पोलीस अमलदार. |

मात्र इतकेंच कीं,—

(१) जेव्हां जेव्हां खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट अगर असिस्टंट सुपरिंटेंडंट किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणताही माजिस्ट्रेट असा कोणताही बारी पदार्थ पकडील, अटकावून ठेवील, किंवा काढून नेईल, तेव्हां तेव्हां, त्यानें, त्याबद्दल जिल्हा माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट केला पाहिजे; आणि

(२) सदरहू फ्याक्टरीच्या सुपरिंटेंडंटांस किंवा असिस्टंट सुपरिंटेंडंटांस, अगर जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणत्याही माजिस्ट्रेटास, जिल्हा माजिस्ट्रेटाची आधीं मंजुरी घेतल्याशिवाय अशा कोणत्याही बारी पदार्थाचा नाश करण्याचा अधिकार नाहीं.

२८. ज्या कोणा मनुष्यास एकादा बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स मिळालेला असेल तो आपल्या मागझिनांत किंवा लैसेन्स दिलेल्या जागेंत त्या बारी पदार्थांचीं स्माल आर्म्सचीं कोणतींही काडतुसें विकण्यासाठीं किंवा इतर कारणासाठीं भरून तयार करितो या कारणावरून, त्यास तो बारी पदार्थ तयार करण्याबद्दल लैसेन्स घ्यावा लागणार नाहीं:

मात्र, त्याणें खालीं लिहिलेल्या नियमांप्रमाणें चाललें पाहिजे :—

(१) ज्या खोलींत याप्रमाणें काडतुसें भरण्याचें काम चालविण्यांत येत असेल त्या खोलींत ५ रत्तलांहून अधिक बंदुकीची दारू किंवा स्थानिक सरकार यासंबंधानें सेफ्टी काडतुसें न केलेल्या अशा ज्या इतर कोणत्याही बारी पदार्थाच्या बाबतींत जें परिमाण ठरवील तो बारी पदार्थ त्या परिमाणाहून अधिक असूं नये ;

(२) सदर्हूप्रमाणें काडतुसें भरण्याच्या संबंधाचें नसलेलें कोणतेंही काम, सदर्हूप्रमाणें भरण्याचें काम चालत असेल त्यावेळीं, सदर्हू खोलींत चालवूं नये ;

(३) सदर्हूप्रमाणें काडतुसें भरण्याचें काम चालू असतांना, त्या खोलींत, कोणताही विस्तव असतां कामा नये किंवा आगीचा अगर स्फोटाचा धोका ज्यापासून उत्पन्न होणार नाहीं अशा रचनेचा, अशा जागीं ठेविलेला किंवा अशा प्रकारचा दिवा शिवायकरून इतर कोणताही कृत्रिम दिवा असतां कामा नये ;

(४) सदर्हूप्रमाणें, काडतुसें भरण्याचें काम ज्या खोलींत चालू असेल ती खोली मागझीनपासून सुटी, परंतु तिच्या अगदीं शेजारच्या ठिकाणीं असून, लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यानें त्या लैसेन्सावर जें अंतर निर्दिष्ट केलें असेल तितक्या अंतरावर असली पाहिजे ; आणि

(५) सदर्हू प्रकारच्या खोलीच्या वहिवाटदारानें, त्याचा लैसेन्स ज्या अधिकाऱ्यानें दिलेला असेल त्या अधिकाऱ्यास, आपणास ह्या कानूअन्वयें जीं काडतुसें भरण्याचा अधिकार दिलेला आहे तीं काडतुसें भरण्याच्या आपल्या इराद्याबद्दल नोटीस केली पाहिजे.

२८. अ.—कोणताही बारी पदार्थ कबजांत ठेवण्याबद्दल लैसेन्स दिलेल्या मनुष्याला, तो आपल्या मागझीनसंबंधानें किंवा लैसेन्स दिलेल्या जागेसंबंधानें, केवळ आपल्या खाणींत किंवा आपण करीत असलेल्या किंवा आपल्या निर्बंधांत असलेल्या कोणत्याही खोदण्याच्या किंवा इतर कामांत वापरण्यासाठीं तो बारी पदार्थ काडतुसें भरून, चार्ज करून, मुकवून, चाळून, बसवून किंवा इतर रीतीनें उपयोगी पडण्याकरितां तयार करीत असतो या कारणावरून, त्याला तयार करण्याचा लैसेन्स घेणें भाग पडणार नाहीं :

मात्र त्या मनुष्यानें खालील नियमांप्रमाणें वागलें पाहिजे :—

(१) ज्या वर्कशापमध्यें सदर्हू प्रकारें बारी पदार्थ तयार करण्याचें काम चाललेलें असेल, त्यांत १०० रत्तलांहून जास्त बंदुकीची दारू, किंवा स्थानिक सरकार इतर कोणत्याही बारी पदार्थासंबंधानें या बाबतींत जें कोणतेंही परिमाण ठरवील त्या परिमाणाहून जास्त तो बारी पदार्थ, असूं नये ;

(२) अशा वर्कशापमध्यें सदर्हू प्रकारें तयार करण्याचें काम चालू असतांना, तेथें त्या कामाशीं संबंध नाहीं असें कोणतेंही काम करतां कामा नये ;

(३) सदर्हू वर्कशाप, मागझीनपासून सुटें परंतु त्याच्या अगदीं शेजारच्या ठिकाणीं, लैसेन्स देणारा अधिकारी त्या लैसेन्सावर निर्दिष्ट करील तितक्या अंतरावर, असलें पाहिजे ;

(४) एका प्रकारच्या बारी पदार्थाचें रूपांतर करून त्याचा दुसऱ्या प्रकारचा बारी पदार्थ करतां कामा नये, किंवा त्याचें पृथक्करण करून त्याचे घटक निरनिराळे करतां कामा नये ; आणि

(५) त्या वर्कशापच्या वहिवाट करणारानें सदर्हू प्रकारचें तयार करण्याचें काम चालविण्याचा आपला इरादा असल्याबद्दल, लैसेन्स देण्याऱ्या अधिकाऱ्याला नोटीस दिली पाहिजे.

## सामान्य.

२९. ह्या कानूंअन्वयें दिलेला प्रत्येक लैसेन्स ज्या शर्तीस पात्र करून दिला असेल त्या शर्तींतून कोणत्याही शर्तीचें उल्लंघन केल्यास, तो रद्द होण्यास पात्र होईल असें समजावें.

३०. बारी पदार्थ तयार करण्यास, कबज्यांत ठेवण्यास किंवा विकण्यास लैसेन्स मिळालेला कोणी मनुष्य जर मरण पावेल, किंवा नादार होईल किंवा मनानें असमर्थ अगर इतर रीतीनें अपंग होईल तर, अशा लैसेन्सवाल्याचें काम चालविणाऱ्या मनुष्यास, असल लैसेन्स चालू असावयाच्या शिलक राहिलेल्या मुदतींत आपल्या स्वतःच्या नांवानें नवीन लैसेन्स मिळण्यासाठीं लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्जी करण्यास वाजवी रीतीनें जरूर असेल तेवढ्या

वेळांत सदहूं लैसेन्साअन्वयें काम चालविण्याबद्दल किंवा काम करण्याबद्दल तो मनुष्य हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांअन्वयें कोणत्याही शिक्षेस, किंवा त्याचा सदहूं लैसेन्स रद्द केला जाण्यास पात्र होईल असें समजूं नये. असा नवीन लैसेन्स एक रुपया दिला असतां, देण्यांत येईल.

३१. ह्या कानूंअन्वयें घ्यावयाच्या फी वठविलेल्या स्टांपांच्या रूपानें घेतल्या पाहिजेत. साधारणत: लैसेन्सां-साठींच्या किंवा लैसेन्स नवीन करून देण्यासाठींच्या अर्ज्या, दुसऱ्या रीतीनें ठराव केला नसेल तर साध्या कागदावर लिहिल्या पाहिजेत, आणि लैसेन्स देणें ते, अशा लैसेन्सांबाबद किंवा ते नवीन करून देण्याबाबद घ्यावयाच्या फीच्या रकमेइतक्या किंमतीच्या वठविलेल्या स्टांपांवर दिले पाहिजेत.

३२. कानू १२ याअन्वयें बारी पदार्थ तयार करण्याविषयींचे, किंवा २१ व्या कानूअन्वयें ५ व्या ( फलिमने-टच्या ) वर्गाचे बारी पदार्थ कबजांत ठेवण्याविषयींचे लैसेन्स खेरीजकरून इतर सर्व लैसेन्सांची मुदत, ज्या वर्षांबाबद ते दिले असतील त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस संपेल असें समजावें. १२ व्या व २१ व्या कानूं-अन्वयें दिलेले लैसेन्स, त्यांमध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत चालू राहतील. परंतु लैसेन्साची मुदत वाढविणें ती नवीन लैसेन्स देण्यास जेणेंकरून, सदहूं आक्ट व कानू यांअन्वयें अधिकार येत नसेल, किंवा हरकत आहे असें लैसेन्स देणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटेल, अशा रीतीनें हकीकतींत फेरफार झाला नसल्यास मात्र, त्या लैसेन्साची मुदत संपण्यापूर्वी अर्जी आली असतां व मूळ फी दिली असतां, वाढविण्याचा अधिकार आहे.

३३. ह्या कानूंअन्वयें दिलेला लैसेन्स हरवला असेल किंवा अकस्मात नाश पावला असेल तेव्हां आठ आणे फी दिली असतां त्याची नकल लैसेन्सवाल्यास देण्याचा अधिकार आहे.

३४. जो कोणताही मनुष्य ह्या कानूंस अनुसरून दिलेला लैसेन्स धारण करीत असेल किंवा तशा लैसेन्सा-अन्वयें काम करीत असेल, त्या मनुष्यास तो लैसेन्स हजर करण्याविषयीं बारी पदार्थांच्या कोणत्याही इन्स्पेक्टरानें किंवा कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा पोलीसठाणें स्वाधीन असणाऱ्या पोलीस अमलदारानें किंवा त्याच्याहून वरच्या दरजाच्या कोणत्याही पोलीस अमलदारानें फर्माविलें असतां त्याप्रमाणें करणें त्या मनुष्यास भाग आहे.

३५. ह्या कानूंअन्वयें काम करणारे सर्व माजिस्ट्रेट वगैरे अधिकारी हे आपआपल्या कारभारासंबंधी वरि-ष्ठांच्या व स्थानिक सरकारच्या निर्बंधास पात्र राहून आपआपलीं कामें करतील.

३६. सदरील कानूंअन्वयें लैसेन्स देण्याचा अखत्यार मिळालेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास योग्य वाटेल तर हिंदुस्तानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) याअन्वयें दिलेल्या लैसेन्सासारखाच एकाद्या लैसेन्सचा अमल चालेल असें, त्या लैसेन्सावर लेखी हुकुम करून फर्माविण्यास तो अधिकारी मुखत्यार आहे.

३७. हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) यांत युद्धसामग्री या शब्दाची ज्या-प्रमाणें व्याख्या केली आहे तशा युद्धसामग्रीच्या सदराखालीं येणारा कोणताही बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा ज्या कोणत्याही मनुष्यास तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून कायदेशीर रीतीनें हक्क असेल, त्या मनुष्याला आपल्या स्वतःच्या खासगी उपयोगासाठीं वाजवी मानानें तसा कोणताही बारी पदार्थ, ह्या कानूंअन्वयेंच्या लैसेन्सावांचून, कबज्यांत ठेवण्याचा अधिकार आहे.

## परिशिष्ट.

### नमुना अ.

( ८ वी कानू पहा. )

फी — रुपये, स्टांपांच्या रूपानें.

**बंदुकीची दारू, किंवा ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गांतील बारी पदार्थ तयार करण्याविषयीं, विकण्याविषयीं, व कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.**

**इलाका-शहर व त्याचीं पोटगांवें यांमध्यें, पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव, वगैरे आणि राहण्याची जागा. | काम चालविण्याची, कारखान्याची किंवा दुकानाची जागा. | कोणत्याही एकाच वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थांचें कमाल परिमाण. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती तयार करावयाचा तें. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती कबज्यांत ठेवावयाचा व विकावयाचा तें. | ज्या तारखेस लैसेन्सची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तारीख ३१ वी डिसेंबर सन १८९ . |

——— जिल्हा, }
——— १८९ . }

(शिक्का.)

(सही)

———चा———

### शर्ती.

हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ( सन १८८४ चा ४ वा ) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें, तयार केलेल्या सर्व बारी पदार्थांबाबद, दास्तानांत शिलक असेल त्या सर्व शिलकेबाबद व सर्व विकऱ्यांबाबद कागदपत्र व हिशोब, सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविले पाहिजेत.

३. लैसेन्स धारण करणारास त्याचें दास्तान आणि त्याचीं तयार करण्याबाबदचीं व विकरीबाबदचीं बुकें हीं दाखविण्याविषयीं कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा इन्स्पेक्टराच्या दरज्याहून खालच्या दरज्याचा नसणाऱ्या कोणत्याही पोलीस अमलदारानें सांगितलें असतां त्यानें त्याप्रमाणें तीं अशा अमलदारास दाखविलीं पाहिजेत.

४. बारी पदार्थ तयार करणें तो, कोणत्याही राहात्या घरापासून खालीं निर्दिष्ट केलेल्या अंतरावर असलेल्या आणि केवळ त्याच कामाकडे लाविलेल्या एकाद्या तंबूंत किंवा विशेष मजबूत रीतीनें न बांधलेल्या अशा एकाद्या इमारतींत तयार केले पाहिजेत; सदहू अंतरें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत :—

(अ) बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० यार्ड;

(ब) ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गांतील बारी पदार्थांच्या बाबतींत ५० यार्ड;

आणि कोणत्याही हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून, किंवा सार्वजनिक जागेपासून हींच अंतरें राखलीं पाहिजेत. स्माल आर्म्ससाठीं काडतुसें भरण्याच्या बाबतींत, ती कृति एकाद्या इमारतीच्या वरील मजल्यांत चालवणें जास्त बरें वाटल्यास तसें करण्यास हरकत नाहीं : मात्र ती कृति जेथें चाललेली असेल, त्या खोलींत, सेफ्टी काडतुसांमध्यें भरलेला बारी पदार्थ शिवायकरून इतर बारी पदार्थ ९ रतलांहून जास्त असूं नये. इतर सर्व बाबतींत तें तयार करण्याचें काम एकमजली इमारतींत चालविलें पाहिजे.

५. ह्या लैसेन्साअन्वयें बारी पदार्थाच्या करावयाच्या सर्व विक्र्या लैसेन्सांत दर्शविलेल्या जागीं केल्या पाहिजेत.

६. बारी पदार्थ, जें कोणतेंही मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकूं नये.

७. लैसेन्सवाल्याच्या कबज्यांत असलेला बारी पदार्थ; जी कोणतीही मजबूत व अज्वालाग्राही व स्थानिक सरकार ठरवील त्या अमलदारानें पसंत. केलेली इमारत किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ, शर्त ४ हींत ठरविलेल्या अंतरांइतकी कोणत्याही राहात्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून, किंवा सार्वजीनक जागेपासून दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस आंत जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें केलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे.

मात्र असें ठरविलें आहे कीं, १० रत्तलांहून अधिक नाहीं इतकी बंदुकीची दारू, किंवा याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रतलाच्या बदला ६ व्या वर्गाच्या १ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल बारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७व्या (दारूकामाच्या) वर्गाचा बारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेल्या इमारतीशिवाय इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें ठेविण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंही ठरविलें आहे कीं ज्या कोणत्याही बारी पदार्थांत त्याच्या आंगचेंच पेट घेण्याचें साधन असेल तो (६ व्या (युद्धसामग्रीच्या) १ल्या भागांतील बारी पदार्थ शिवाय करून इतर) बारी पदार्थ आगीची भीति नाहीं अशा सेफमध्यें ठेवूं नये.

८. बारी, किंवा फार लवकर पेट घेणाऱ्या प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदहू बारी पदार्थापासून, आणि तो ज्या कोणत्याही खोलींत, इमारतीच्या भागांत, आगीची भीति नाहीं अशा सेफींत, किंवा पात्रांत ठेवलेला असेल त्या खोलीपासून, इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होय अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत. आणि अशा खोलींत किंवा इमारतीच्या भागांत किंवा सेफींत किंवा पात्रांत जाणाऱ्या कोणत्याही मनुष्याजवळ किंवा त्याच्या बुटांस किंवा जोड्यांस लाविलेलें असें कोणतेंही लोखंड किंवा पोलाद असूं नये.

९. केवळ बारी पदार्थ तयार करण्याच्याच किंवा ठेवण्याच्याच कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नाहीं अशा सेफीच्या किंवा पात्राच्या आंतल्या बाजूस (तयार करण्याचा कामीं जरूर असलेलीं यंत्रें शिवाय घरून) कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असूं नये.

१०. ६ व्या (युद्धसामग्रीच्या वर्गाच्या) १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ९ रतलांहून अधिक असलेला सर्व बारी पदार्थ, आणि १ रतलाहून अधिक असलेला दुसरा सर्व बारी पदार्थ हे, बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत, आणि जर ते उघड रीतीनें विकण्यासाठीं मांडले असतील किंवा विकण्यांत येत असतील तर असे बारी पदार्थ भरलेल्या अगदीं बाहेरच्या पात्रावर, त्या बारी पदार्थांचें नांव, डाग देऊन किंवा नांवाची चिठ्ठी किंवा दुसरी निशाणी मजबूत जडून, ढळढळीत अक्षरांनीं लावलें पाहिजे.

११. ज्या ज्या प्रकारचा बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे, त्या बारी पदार्थांतून एक बारी पदार्थ बार होऊन उडाला किंवा पेटला तर त्याच्या बाराचा किंवा पेटाचा ज्याच्या योगानें दुसऱ्या बारी पदार्थांत मुळींच संचार होणार नाहीं अशा प्रकारचा मध्यें पडदा घालून किंवा तशी जागा मध्यें ठेवून ते बारी पदार्थ एकमेकांपासून निराळे ठेविले पाहिजेत. तथापि एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास आणि बंदुकीची दारू सेफ्टी फूजीबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

*१२. लैसेन्स धारण करणारानें आपल्या दुकानावर किंवा काम करण्याच्या जागेवर सन १८७८ चा हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट याअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ११ व्या कानूंत सांगितल्या प्रकारची एक नांवाची पाटी लाविली पाहिजे, आणि आपल्या दुकानांत त्या आक्टाच्या २८ व्या कलमाची नकल लाविली पाहिजे.

*१३. लैसेन्स धारण करणारानें, सन १८७८चा हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट याअन्वयें ठरविलेल्या नमुन्यांपैकीं नमुना ८ किंवा ९ याअन्वयेंचा लैसेन्स धारण करणाऱ्या प्रत्येक खरीददाराच्या लैसेन्सावर खरेदीच्या वेळीं खालीं लिहिलेल्या तपशिलाचा शेरा लिहिला पाहिजेः—

(अ) विकलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता;

(ब) विकलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) विकरीची तारीख;

आणि त्या शेऱ्यावर आपली सही घातली पाहिजे.

## नमुना व.

(८ वी कानू पहा.)

फी रुपये, रु पांच्या रूपानें.

बंदुकीची दारू, किंवा ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थ विकण्याविषयीं व कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.

इलाका-शहर व त्याचे पोट-गांव यांमध्यें पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव, वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम चालविण्याची, कारखान्याची किंवा दुकानाची जागा. | कोणत्याही एकावेळीं ठेवावयाचें बारी पदार्थांचें कमाल परिमाण. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती कबज्यांत ठेवावयाचा व विकावयाचा तें. | ज्या तरिखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारिख. |
|---|---|---|---|---|
| | | | | तारीख ३१ वी डिसेंबर सन १८९ . |

——— जिल्हा,
——— १८९ .

(शिक्का)

(सही)
——— चा ———

### शर्ती.

१. हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें दास्तानांतील सर्व बारी पदार्थांबाबद व सर्व विक्र्यांबाबद कागदपत्र व हिशोब, सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविले पाहिजेत.

३. लैसेन्स धारण करणारानें त्याचें दास्तान, आणि त्याचीं विकरीबाबदचीं बुकें व कागदपत्र हीं दाखविण्याविषयीं कोणत्याही माजिस्ट्रेटानें किंवा इन्स्पेक्टरच्या दरज्याहून खालच्या दरज्याचा नसणाऱ्या कोणत्याही पोलीस अमलदारानें सांगितलें असतां त्यानें तीं अशा अमलदारास दाखविलीं पाहिजेत.

* हा लैसेन्स हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) याअन्वयें दिलेल्या लैसेन्साप्रमाणें चालेल असें जेव्हां हा लैसेन्स देणारा अधिकारी या लैसेन्सावर हुकुम लिहून फर्मावील तेव्हांच मात्र ह्या शर्ती दाखल कराव्या.

४. ह्या लैसेन्साअन्वयें बारी पदार्थांच्या करावयाच्या सर्व विक्र्या, लैसेन्सांत दर्शविलेल्या जागीं केल्या पाहिजेत.

५. बारी पदार्थ, जें कोणतेंहि मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकूं नये.

६. बारी पदार्थ ठेवणें तो, जी कोणतीही मजबूत व अग्न्यालाग्राही व स्थानिक सरकार ठरवील त्या अमलदारानें पसंत केलेली इमारत, किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ ठरीव* अंतरांइतकी कोणत्याही राहत्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस आंत जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें केलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे:

मात्र असें ठरविलें आहे कीं, ५० रत्तल बंदुकीची दारू किंवा, याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रत्तलाच्या बदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल बारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाचा बारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेली इमारत खेरीजकरून इतर कोणत्याहि इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेविण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें ठेविण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंही ठरविलें आहे कीं ज्या कोणत्याही बारी पदार्थांत, त्याच्या आंगचेंच पेटण्याचें साधन असेल तो ( ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) १ ल्या भागांतील बारी पदार्थ शिवायकरून इतर ) बारी पदार्थ आगीची भीति नाहीं अशा सेफमध्यें ठेवूं नये.

७. बारी किंवा फार लवकर पेट घेणाऱ्या प्रकारच्या, सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं सदहू बारी पदार्थांपासून, आणि तो ज्या कोणत्याही खोलींत किंवा इमारतीच्या भागांत, किंवा आगीची भीति नाहीं अशा सेफींत, किंवा पात्रांत ठेवलेला असेल त्या खोलीपासून, इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रांपासून निर्भय होय अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत, आणि अशा खोलींत, इमारतीच्या भागांत, सेफींत किंवा पात्रांत जाणाऱ्या कोणत्याही मनुष्यांच्या कबजामध्यें किंवा त्यांच्या बुटांस अगर जोड्यांस लाविलेलें असें कोणतेंही पोलाद किंवा लोखंड असूं नये.

८. वर सांगितल्या प्रकारच्या, केवळ बारी पदार्थ ठेवण्याच्याच कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नाहीं अशा सेफीच्या किंवा पात्राच्याही आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असूं नये.

९. ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ५ रतलांहून अधिक असलेला सर्व बारी पदार्थ, आणि १ रतलाहून अधिक असलेला दुसरा सर्व बारी पदार्थ हे, बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत; आणि जेव्हां ते उघड रीतीनें विकण्यासाठीं मांडले असतील किंवा विकण्यांत येत असतील तेव्हां असे बारी पदार्थ भरलेल्या अगदी बाहेरच्या पात्रावर त्या बारी पदार्थांचें नांव, डाग देऊन किंवा नांवाची चिठ्ठी किंवा दुसरी निशाणी मजबूत जडून, ढळढळीत अक्षरांनीं लावलें पाहिजे.

१०. ज्या ज्या प्रकारचा बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे त्या बारी पदार्थांतून एकादा बारी पदार्थ बार होऊन उडाला किंवा पेटला तर त्याच्या बारांचा किंवा पेटाचा ज्याच्या योगानें दुसऱ्या बारी पदार्थांत मुळींच संचार होणार नाहीं तशा पदार्थांचा व तशा प्रकारचा पडदा मध्यें घालून किंवा तशी जागा मध्यें ठेवून ते बारी पदार्थ एकमेकांपासून निराळे ठेविले पाहिजेत; तथापि एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास आणि बंदुकीची दारू सेफ्टी फ्यूजबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

---

* बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० य.र्ड.

६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थांच्या बाबतींत ५० यार्ड

* ११. लैसेन्स धारण करणारानें आपल्या दुकानावर किंवा काम करण्याच्या जागेवर हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा आक्ट ११ ) याअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ११ व्या कानूंत सांगितल्या प्रकारची एक नांवाची पाटी लाविली पाहिजे, आणि आपल्या दुकानांत त्या आक्टाच्या २८ व्या कलमाची नकल लाविली पाहिजे.

* १२. लैसेन्स धारण करणारानें, सन १८७८ चा हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट याअन्वयें ठरविलेल्या नमुन्यांपैकीं नमुना ८ किंवा ९ याअन्वयेंचा लैसेन्स धारण करणाऱ्या प्रत्येक खरीददाराच्या लैसेन्सावर खरेदीच्या वेळीं खालीं लिहिलेल्या तपशिलाचा शेरा लिहिला पाहिजे:—

(अ) विकलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता;

(ब) विकलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) विक्रीची तारीख;

आणि त्या शेऱ्यावर आपली सही घातली पाहिजे.

---

## नमुना क.

### ( ८ वी कानू पहा. )

फी---आठ आणे. स्टांपांच्या रूपानें.

**बंदुकीची दारू, किंवा ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या ( दारूकामाच्या ) वर्गांतील बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयीं लैसेन्स.**

**इलाका-शहर व त्याचे पोट-गांव यांत पोलीस कमिशनरानें आणि इतर जागीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव, वगैरे, आणि राहण्याची जागा. | बारी पदार्थ सालांत कोणत्या प्रकारचा व किती कबज्यांत ठेवावयाचा तें. | जेथें बारी पदार्थ कबज्यांत ठेवावयाचा असेल ती जागा व तिचा पुरा तपशील. | कोणत्याही एका वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थाचें कमाल परिमाण. | ज्या तारखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|
| | | | | तारीख ३१ वी डिसेंबर सन १८९ |

———— जिल्हा, ———— १८९ . (सही) (शिक्का.) ———— चा ————

---

* हा लैसेन्स हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट ( सन १८७८ चा ११ वा ) याअन्वयें दिलेल्या लैसेन्साप्रमाणें चालेल असें जेव्हां हा लैसेन्स देणारा अधिकारी या लैसेन्सावर हुकुम लिहून फर्मावील तेव्हांच मात्र या शर्ती दाखल कराव्या.

## शर्ती.

१. हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. बारी पदार्थ ठेवणें तो जी कोणतीही मजबूत व अज्वालाग्राही व स्थानिक सरकार ठरवील त्या मनुष्यानें पसंत केलेली इमारत किंवा जी कोणतीही आगीची भीति नसणारी सेफ ठरीव* अंतरांइतकी कोणत्याही रहाण्याच्या घरापासून, हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून दूर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस आंत जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें केलेली व बंद केलेली असेल, त्या इमारतींत किंवा सेफींत ठेविला पाहिजे.

मात्र असें ठरविलें आहे कीं ५० रत्तल बंदुकीची दारू किंवा, याप्रमाणें न ठेविलेल्या बंदुकीच्या दारूच्या प्रत्येक रत्तलाच्या बदला ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील युद्धसामग्रींत भरलेला २ रत्तल बारी पदार्थ, किंवा तितक्याच मानानें ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाचा बारी पदार्थ, राहत्या घरांत, किंवा सदरीं शेवटीं सांगितलेली इमारत खेरीज-करून इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें, ठेवण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंही ठरविलें आहे कीं (६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ शिवायकरून) ज्या कोणत्याही बारी पदार्थांत त्याच्या आंगचें पेट घेण्याचें साधन असेल तो बारी पदार्थ आगीची भीति नाहीं अशा सेफमध्यें ठेवूं नये.

३. बारी, किंवा फार लवकर पेट घेणाऱ्या प्रकारच्या, सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं, सदहू बारी पदार्थापासून आणि तो ज्या कोणत्याही खोलींत किंवा इमारतीच्या भागांत किंवा, आगीची भीति नाहीं अशा सेफींत, किंवा पात्रांत भरला असेल, तशा खोलीपासून, इमारतीच्या भागापासून, सेफीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होय, अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत; आणि अशा खोलींत, इमारतीच्या भागांत, सेफींत किंवा पात्रांत येणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या कबजांत किंवा त्याच्या बुटांस किंवा जोड्यांत लाविलेलें असें कोणतेंही लोखंड किंवा पोलाद असूं नये.

४. वर सांगितल्या प्रकारच्या, केवळ बारी पदार्थ ठेवण्याच्याच कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच आगीची भीति नाहीं अशा सदहू सेफीच्या किंवा पात्राच्याही आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असूं नये.

५. ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील ५ रतलांहून अधिक असलेला सर्व बारी पदार्थ, आणि १ रतलाहून अधिक असलेला दुसरा सर्व बारी पदार्थ, ते बाहेर न निघत अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविले पाहिजेत.

६. ज्या ज्या प्रकारचा बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें ठेवण्याचा अधिकार आहे त्या बारी पदार्थांतून एक पदार्थ बार होऊन उडाला किंवा पेटला तर त्याच्या बाराचा किंवा पेटाचा ज्याच्या योगानें दुसऱ्या बारी पदार्थांत मुळींच संचार होणार नाहीं तशा पदार्थांचा किंवा तशा प्रकारचा मध्यें पडदा घालून किंवा तशी जागा मध्यें ठेवून ते बारी पदार्थ एकमेकांपासून निराळे ठेविले पाहिजेत. तथापि एकाच वर्गाचे बारी पदार्थ एकत्र ठेवण्यास हरकत नाहीं आणि बंदुकीची दारू सेफ्टी फूजीबरोबर ठेवण्यास हरकत नाहीं.

७. लैसेन्स धारण करणारा ज्या विकणारापासून खरेदी करील त्या विकणाराकडून त्याणें खरेदीच्या वेळीं आपल्या लैसेन्सावर खालीं लिहिलेल्या मजकुराचा शेरा त्या विकणाराच्या सहीनिशीं लिहविला पाहिजे:—

(अ) खरीद केलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता;

(ब) खरीद केलेल्या जिनसांचा प्रकार व मान;

(क) खरेदीची तारीख.

---

* बंदुकीच्या दारूच्या बाबतींत, १०० यार्ड.

६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ल्या भागांतील किंवा ७ व्या (दारूकामाच्या) वर्गांतील बारी पदार्थांच्या बाबतींत, ५० यार्ड.

## नमुना ड.

(१४ वी कानू पहा.)

फी—पांच रुपये, स्टांपांच्या रूपानें.

### बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याविषयीं लैसेन्स.

**इलाकाशहर व त्याचीं पोटगांवें यांत पोलीस कमिशनरानें व इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव, वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम करण्याची किंवा दुकानाची जागा. | बारी पदार्थाचा प्रकार. | कोणत्याही एका वेळीं ठेवावयाचें बारी पदार्थाचें (६० रत्तलांतून जास्त नाहीं असें) कमाल परिमाण. | ज्या तारखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

———— जिल्हा,
———— १८९ .

(शि. क्का.)

(सही)

———— चा ————

## शर्ती.

१. हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. बारी पदार्थ ठेवणें तो, जी इमारत केवळ त्याच कामाला लावलेली असून मजबूत बांधलेली असेल व राहत्या घरापासून निराळी केलेली असेल, आणि कोणत्याही हमरस्त्यापासून, स्ट्रीटपासून, सार्वजनिक रहदारीच्या मार्गापासून किंवा सार्वजनिक जागेपासून, निर्भय होय, अशा अंतरावर असेल, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस तेथें जातां न येई व बाहेरील धोक्यापासून सुरक्षित राही अशा रीतीनें केलेली व बंद केलेली असेल, तशा इमारतींत ठेवली पाहिजे.

मात्र असें ठरविलें आहे कीं १५ रत्तलांहून अधिक नाहीं इतका सदर्हू प्रकारचा बारी पदार्थ सदरीं शेवटीं सांगितलेली इमारत खेरीजकरून इतर कोणत्याही इमारतींत, केवळ बारी पदार्थच ठेवण्याच्या कामीं लावलेल्या पात्रामध्यें ठेवण्याचा अधिकार आहे.

३. बारी किंवा फार लवकर पेट घेणाऱ्या प्रकारच्या सर्व जिनसा किंवा पदार्थ हीं सदर्हू बारी पदार्थापासून, आणि तो ज्या कोणत्याही इमारतींत किंवा पात्रांत ठेवलेला असेल त्या इमारतीपासून किंवा पात्रापासून, निर्भय होय, अशा अंतरावर ठेविलीं पाहिजेत.

४. केवळ बारी पदार्थ ठेवण्याच्याच कामाला लावलेल्या इमारतीच्या आणि तसेंच सदर्हू पात्राच्याही आंतल्या बाजूस कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असूं नये.

५. १ रत्तलाहून अधिक असलेला सदर्हू प्रकारचा सर्व बारी पदार्थ, तो बाहेर न निघे अशा प्रकारें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविला पाहिजे.

६. ज्या ज्या प्रकारचा बारी पदार्थ ह्या लैसेन्साअन्वयें कायदेशीर रीतीनें ठेवण्याचा अधिकार असेल त्या त्या प्रकारच्या बारी पदार्थांतून एक बारी पदार्थ वार होऊन उडाला किंवा पेटला तर त्याच्या बाराचा किंवा पेटाचा ज्याच्या योगानें दुसऱ्या बारी पदार्थांत मुळींच संचार होणार नाहीं तशा पदार्थांचा व तशा प्रकारचा मध्यें पडदा घालून किंवा तशी जागा मध्यें ठेवून ते बारी पदार्थ एकमेकांपासून निराळे ठेविले पाहिजेत.

७. लैसेन्स धारण करणारा ज्या विकणारापासून खरेदी करील त्या विकणाराकडून त्याणें खरेदीच्या वेळीं आपल्या लैसेन्सावर खालीं लिहिलेल्या मजकुराचा शेरा त्या विकणाऱ्याच्या सहीनिशीं लिहविला पाहिजे :—

(अ) खरीद केलेल्या जिनसा जो मनुष्य आपल्या स्वाधीन घेईल त्या मनुष्याचें नांव व पत्ता ;

(ब) खरीद केलेल्या जिनसांचा प्रकार व मान ;

(क) खरेदीची तारीख.

---

## नमुना ई.

(१७ वी कानू पहा.)

फी–वीस रुपये, स्टांपांच्या रूपानें.

### बारी पदार्थ कबज्यांत ठेविण्याविषयीं लैसेन्स.

स्थानिक सरकारानें द्यावयाचा.

| लैसेन्स धारण करणाराचें नांव आणि राहण्याची जागा. | ज्या मागझीनास हा लैसेन्स लागू आहे त्या मागझीनाच्या ठिकाणाच्या जमिनीच्या चतुःसीमा. | मागझीनाच्या संबंधाच्या इमारती व कामें यांचें स्थान, प्रकार व बांधणी. | कबजांत ठेवावयाच्या बारी पदार्थांचा प्रकार. | मागझीनांत, व त्याच्या ठिकाणाच्या चतुःसीमांच्या आंत, एकाच वेळीं कबज्यांत ठेवावयाच्या बारी पदार्थांचें मान. | ज्या तारखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

———— जिल्हा, }
———— १८९ . }

(शिक्का.)

(सही)

———— चा ————

**शर्ती.**

१. हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टा-अन्वयें केलेल्या कानू, यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. बारी पदार्थ सदहू मागझीनांत एकाच वेळीं असणें तो ह्या लैसेन्सांत निर्दिष्ट केलेल्या मानाहून अधिक मानानें असूं नये.

३. सदहू मागझीनचा उपयोग करणें तो, केवळ ह्या लैसेन्सांत निर्दिष्ट केलेला बारी पदार्थ किंवा निर्दिष्ट केलेले बारी पदार्थ, आणि असा बारी पदार्थ किंवा असे बारी पदार्थ ठेवण्याचीं पात्रें, किंवा ते ठेवण्याच्या संबंधाच्या कामाकरितां हत्यारें किंवा आउतें, हीं ठेवण्यासाठींच मात्र करावा.

४. सदहू मागझीनाची आंतली बाजू आणि त्यांतील बांक, घडवंच्या व फिटिंग्स हीं, कोणतेंहि लोखंड किंवा पोलाद उघडें न राही अशा रीतीनें, आणि कोणतीही रेंव, लोखंड, पोलाद किंवा तसेच दुसरे पदार्थ हीं वेगळीं होऊन सदहू बारी पदार्थांशीं न लागत अशा रीतीनें घडलेलीं पाहिजेत किंवा त्यांवर आस्तर किंवा आच्छादन घातलेलें पाहिजे, आणि अशी आंतली बाजू बांक, घडवंच्या व फिटिंग्स यांजवर, व्राजवी रीतीनें शक्य असेल तेथवर रेंव राहूं देऊं नये व तीं इतर प्रकारें साफ ठेवावीं; आणि पाणी लागल्यानें भयकारक परिणाम होण्यास जो बारी पदार्थ पात्र असेल तसा कोणताही बारी पदार्थ कबजांत ठेवण्याच्या प्रसंगीं त्या बारी पदार्थास पाणी न लागण्या-विषयीं योग्य पूर्वोपाय केले पाहिजेत.

५. सदहू मागझीनास एक पुरेसा* लैट्निंग कंडक्टर जोडला पाहिजे, आणि त्याची दरसाल निदान एकदां परीक्षा केली पाहिजे.

६. एकादी खोली किंवा मागझीन याची किंवा त्याच्या कोणत्याही भागांत मरामत करण्यापूर्वी, शक्य असेल तेथवर त्यांतील सगळा बारी पदार्थ किंवा त्याचीं मिश्र केलेलीं द्रव्यें (बाहेर) काढलीं पाहिजेत आणि अशी खोली किंवा भाग हीं पूर्णपणें धुऊन स्वच्छ केलीं पाहिजेत; आणि याप्रमाणें स्वच्छ केल्यानंतर ह्या शर्ती, अशा खोलींत किंवा मागझी-नच्या भागांत बारी पदार्थ पुनः नेण्यांत येई तोंपर्यंत, बारी पदार्थांस लागू असण्याच्या बंद होतील.

७. ह्याप्रमाणें स्वच्छ केल्यानंतर मात्र खेरीजकरून इतर प्रसंगीं सदहू मागझीनच्या कोणत्याही भागांत, किंवा कोणत्याही भागाची कोणतीही मरामत करण्यांत, उपयोग करावयाचीं सर्व हत्यारें व आउतें लांकडांचीं, तांब्याचीं, किंवा पितळेचीं, किंवा दुसऱ्या कोणत्या तरी नरम धातूंचीं किंवा पदार्थांचीं केलेलीं असावीं, किंवा त्यांवर कांहीं निर्भय व योग्य पदार्थांचें आच्छादन केलेलें असावें.

८. आग, आगीच्या काड्या किंवा जेणेंकरून बार होण्याचा किंवा आग लागण्याचा संभव असेल तस कोणताही पदार्थ किंवा जिन्नस, किंवा कोणतेंही लोखंड, पोलाद किंवा रेंव यांचा मागझीनांत प्रवेश न व्हावा ह्मणून, खिसे नसणाऱ्या, काम करण्याच्या वेळीं घालावयाच्या, योग्य कपड्यांचा व योग्य जोड्यांचा उपयोग करून, झाडा घेऊन व दुसऱ्या रीतीनें, किंवा अशाच कांहीं उपायानें कांहीं योग्य तजवीज केली पाहिजे; परंतु आग लागण्याचा किंवा बार होण्याचा कोणताही धोका उत्पन्न न होई अशा रीतीनें केलेला, ठेवलेला, किंवा अशा प्रकारचा, कृतीनें केलेला दिवा आंत नेण्याची या कानूवरून मनाई नाहीं.

९. कोणत्याही मनुष्यानें मागझीनच्या कोणत्याही भागांत तंबाकू वगैरे ओढूं नये.

१०. १६ वर्षांहून कमी वयाच्या कोणत्याही मनुष्यास कोणी मोठा मनुष्य हजर असेल तेव्हां व त्याच्या देख-रेखीखालीं मात्र खेरीजकरून इतर प्रसंगीं मागझीनांत कामास लावूं नये किंवा त्याणें मागझीनांत शिरूं नये.

११. जे दोन किंवा अधिक प्रकारचे बारी पदार्थ लैसेन्स मिळालेल्या एकाद्या मागझीनांत कायदेशीर रीतीनें कबज्यांत ठेवण्याचा अधिकार असेल ते दोन किंवा अधिक बारी पदार्थ एकाच मागझीनांत कबज्यांत ठेवण्याचा अधिकार आहे; मात्र त्या बारी पदार्थांतून एक बारी पदार्थ बार होऊन उडाला किंवा पेटला तर त्याच्या बाराचा किंवा पेटाचा ज्याच्या योगानें दुसऱ्या बारी पदार्थांत मुळींच संचार होणार नाहीं तशा पदार्थाचा व तशा प्रकारचा मध्यें पडद घालून किंवा तशी जागा मध्यें ठेवून ते बारी पदार्थ एकमेकांपासून निराळे ठेविले पाहिजेत. पडदा घालावयाचा तो-खालीं लिहिलेल्या मर्यादांस पात्र आहे:—

* वीज पडली असतां ती परभारें निघून जाण्यासाठीं बसविलेली सळी किंवा तार.

(अ) वर्ग १ ( बंदुकीची दारू ), २ (नैट्रेट-मिक्श्चर ), ३ ( नैट्रो-कांपौंड ) आणि ४ ( क्लोरेट-मिक्श्चर) या वर्गांचे निरनिराळे बारी पदार्थ, ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील सेफ्टी फूजी, आणि ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या दुसऱ्या भागांतील निरनिराळ्या बारी पदार्थांपैकीं ज्यांच्यामध्यें कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद नसेल ते, दरमियान कोणताही पडदा किंवा जागा ठेविल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(ब) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील निरनिराळे बारी पदार्थ, दरमियान कोणताही पडदा किंवा जागा ठेविल्यावांचून एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(क) ६व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील निरनिराळ्या बारी पदार्थांपैकीं ज्यांच्यामध्यें कोणतेंही उघडें लोखंड किंवा पोलाद असेल ते, दरमियान कोणताही पडदा किंवा जागा ठेविल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(ड) ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील निरनिराळे बारी पदार्थ, दरमियान कोणताही पडदा किंवा जागा ठेविल्यावांचून, एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

(इ) ७व्या ( दारूकामाच्या ) वर्गाचे निरनिराळे बारी पदार्थ, दरमियान कोणताही पडदा किंवा जागा ठेवल्यावांचून एकमेकांबरोबर ठेवण्याचा अधिकार आहे.

वर सांगितलें आहे त्याप्रमाणें खेरीजकरून दोन किंवा अधिक प्रकारचे बारी पदार्थ एकाच मागझीनांत ठेवतां कामा नयेत.

१२. लैसेन्सवाल्यानें, व मागझीनांत किंवा त्याच्या आसपास कामास लावलेल्या प्रत्येक मनुष्यानें, मागझीनांत आगीपासून किंवा बार होऊन अपाय न होऊं देण्याविषयीं, आणि अधिकार नसलेल्या मनुष्यांस मागझीनांत किंवा त्यांतील बारी पदार्थांजवळ जाऊं न देण्याविषयीं सर्व योग्य पूर्वोपाय केला पाहिजे; आणि त्याणें, जें कृत्य आग किंवा बार उत्पन्न करण्यासारखें असेल आणि जें अशा मागझीनांतील कामाच्या कारणासाठीं वाजवी रीतीनें जरूर नसेल, तसें कोणतेंही कृत्य करूं नये.

---

## नमुना फ.

( २३ वी कानू पहा. )

फी-पांच रुपये, स्टांपांच्या रूपानें.

### बारी पदार्थ विकण्याविषयीं लैसेन्स.

**इलाका शहरांत आणि त्याच्या पोटगांवांत पोलीस कमिशनरानें आणि इतर ठिकाणीं जिल्हा माजिस्ट्रेटानें द्यावयाचा.**

| लैसेन्स धारण करणाराचें नांव, वगैरे, आणि राहण्याची जागा. | काम करण्याची किंवा दुकानाची जागा. | विकावयाच्या बारी पदार्थांचा प्रकार. | ज्या तारखेस लैसेन्साची मुदत संपते ती तारीख. |
|---|---|---|---|
| | | | |

——— जिल्हा,
——— सन १८९ .

शिक्का.

(सही.)

——— चा ———

## शर्ती.

१. हा लैसेन्स हिंदुस्थानचा बारी पदार्थाविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) व त्या आक्टाअन्वयें केलेल्या कानू, यांतील ठरावांस पात्र करून दिला आहे.

२. लैसेन्स धारण करणारानें दास्तानांतील सर्व बारी पदार्थांबाबद व सर्व विकऱ्यांबाबद कागदपत्र व हिशोब, सरकार वेळोवेळीं फर्मावील तशा नमुन्याप्रमाणें ठेविले पाहिजेत.

३. बारी पदार्थ विकणें तो, जें कोणतेंही मूल १३ वर्षांहून कमी वयाचें दिसत असेल त्यास विकूं नये.

४. वजनानें १ रत्तलाहून अधिक असणारा बारी पदार्थ जेव्हां विकण्यासाठीं उघड रीतीनें मांडला असेल, किंवा विकण्यांत येत असेल, तेव्हां, तो बाहेर न निघे अशा रीतीनें केलेल्या व बंद केलेल्या मजबूत पेटींत, पिशवींत, डब्यांत किंवा दुसऱ्या पात्रांत ठेविला पाहिजे. आणि असा बारी पदार्थ भरलेल्या अगदीं बाहेरच्या पात्रावर त्या बारी पदार्थाचें नांव आणि त्यापुढें "बारी पदार्थ" हे शब्द डाग देऊन किंवा नांवाची चिठी किंवा दुसरी निशाणी मजबूत जडून ढळढळीत अक्षरांनीं घातले पाहिजेत.

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मान्टीथ,

आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे फेब्रुवारी, सन १८९७, रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—**

## सन १८९७ चा आक्ट ३ रा.

**भयंकर सांतीच्या रोगाचा फैलावा होण्याची अधिक चांगल्या रीतीनें बंदी करण्यासाठीं तजवीज करण्याबाबद आक्ट.**

ज्या अर्थीं भयंकर सांतीच्या रोगाचा फैलावा होण्याची अधिक चांगल्या रीतीनें बंदी करण्यासाठीं तजवीज करणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९७ चा सांतीच्या रोगांबाबद आक्ट असें ह्मणावें. लहान सरनामा, व्याप्ति व सुरवात.

(२) तो (उत्तर ब्रह्मदेश, ब्रिटिश बलुचिस्थान, संतळ परगणे आणि स्पिटि परगणा यांसहित) सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. (१) हिंदुस्थानांत किंवा त्याच्या कोणत्याहि भागांत कोणताहि भयंकर सांतीचा रोग उद्भवला आहे किंवा उद्भवण्याची भीति आहे अशी कोणत्याहि वेळीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची खात्री होईल तेव्हां गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, विद्यमान काळीं अमलांत असलेल्या कायद्याचे सामान्य ठराव त्या कारणासाठीं अपुरते आहेत असें त्यांस वाटल्यास, त्या रोगाचा उद्भव किंवा फैलावा न होऊं देण्यासाठीं आपणास जरूर वाटतील त्या तजविजी करण्यास, अगर त्या करण्याचा कोणत्याहि मनुष्यास हुकुम करण्यास किंवा अख्त्यार देण्यास, व आपणास जरूर वाटतील असे जे तात्पुरते नियम लोकांनीं किंवा कोणत्याहि मनुष्यानें किंवा कोणत्याहि वर्गाच्या मनुष्यांनीं पाळावयाचे ते नियम, जाहीर नोटीस देऊन, ठरविण्यास, आणि (नुकसानीचा कोणताहि मोबदला द्यावा लागल्यास त्या मोबदल्यासुद्धा) जो कोणताहि खर्च होईल तो कोणत्या रीतीनें व कोणी अदा करावा तें ठरविण्यास मुखत्यार आहेत. भयंकर सांतीच्या रोगाच्या संबंधानें विशेष तजविजी करण्याचा व नियम ठरविण्याचा अधिकार.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे विशेषेंकरून व वरील ठरावांस साधारणपणें बाध न येई अशा रीतीनें, खालीं लिहिलेल्या बाबतींबाबद तजविजी करण्यास व नियम ठरविण्यास मुखत्यार आहेत—

(अ) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहि बंदरापासून जाणारें किंवा कोणत्याहि बंदरांत येऊन पोहोंचणारें कोणतेंहि तारूं किंवा जहाज तपासण्याबाबद व, जरूर असेल तोंपर्यंत, त्यास किंवा त्यांतून जाऊं इच्छिणाऱ्या अगर येणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास, अटकावून ठेवण्याबाबद; आणि

(ब) रेल्वेनें किंवा इतर प्रकारें प्रवास करणाऱ्या मनुष्यांना तपासण्याबाबद आणि ज्या मनुष्यांस असा कोणताहि रोग झाल्याचा तपासणाऱ्या अमलदारास वहीम येईल त्या मनुष्यांना इसपितळांत, हंगामी राहण्याच्या जागेंत किंवा इतर प्रकारें निराळे ठेवण्याबाबद.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, साधारण किंवा विशेष हुकुम करून, कोणतोंहि स्थानिक सरकार ज्या ज्या मुलुकांचा कारभार चालवीत असेल त्या त्या मुलुकांच्या संबंधानें त्या सरकारानेंहि या आक्टावरून दिलेले सर्व किंवा कोणतेहि अधिकार, चालवावे असें फर्माविण्यास मुखत्यार आहेत.

शिक्षा.

३. या आक्टाअन्वयें केलेला कोणताहि नियम किंवा हुकुम जो कोणताहि मनुष्य तोडील त्यानें हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या १८८ व्या कलमाअन्वयें शिक्षा करण्यालायक अपराध केला आहे असें मानलें पाहिजे.

या आक्टाअन्वयें काम करणाऱ्या मनुष्यांचें रक्षण.

४. जें कोणतेंहि कृत्य या आक्टाअन्वयें केलें असेल किंवा इमानेंइतबारें करावयाचा इरादा असेल त्या कृत्याबद्दल कोणत्याहि मनुष्यावर कोणताहि दावा किंवा इतर कायदेशीर काम चालणार नाहीं असें समजावें.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.